प.३५

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक २०.१०.२०२२**
**इतिवृत्त क्रमांक – ३०**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक २०.१०.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.

प.३२९

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११
(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४
(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १ | **कै.विक्रम राजेंद्र चव्हाण** (मयत सफाई कामगार) | **श्रीम. रविना विक्रम चव्हाण** (पत्नी) | श्रीम.रविना विक्रम चव्हाण यांचा अर्ज मा.शासन निर्णयातील तरतुदीनुसार १ वर्षाचे आत मुदतीत नसलेकारणे त्यांचा अर्ज निकाली काढणेत आलेला होता. श्रीम. रविना चव्हाण यांनी सदरची बाब क्षमायाचीत करणेबाबत वेळोवेळी विनंती अर्ज दिल्याने सेवा प्रवेशातील नियम शिथिल करुन दि. १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रकातील तरतुदीचा मा. आयुक्त महोदय यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारान्वये सदर प्रकरणी वापर करणेस मान्यता दिल्याने सदर प्रकरणी कार्यवाही होणे क्रमप्राप्त असल्याने दिनांक २९.०६.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समिती बैठकीचे निर्देशानुसार श्रीम. रविना विक्रम चव्हाण यांनी सदर दस्तांची पुर्तता केलेली आहे.<br>सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६-ब (सी) दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परपित्रकातील २ (अ) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त महोदय यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारान्वये तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (१) या तरतुदीनुसार 'पत्नी' या नात्याने **श्रीम. रविना विक्रम चव्हाण, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २ | **कै.तुषार सुनिल शिंदे** (मयत सफाई कामगार) | **श्री. विशाल सुनिल शिंदे** नामनिर्देशित व्यक्ती - (भाऊ) | दि.२१.१०.२०२१ रोजीच्या कर्मचारी निवड समितीचे निर्देशान्वये कै.तुषार सुनिल शिंदे यांचे रिक्तपदी त्यांचा भाऊ श्री.अविनाश सुनिल शिंदे हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र असल्याकारणे नियुक्ती आदेश पारीत करणेपुर्वी श्री. अविनाश शिंदे यांना चारीत्र पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेस व्यक्तीशः पत्र देणेत आले. परंतु, सदरच्या काळात श्री. अविनाश सुनिल शिंदे यांचे दि.१३.०१.२०२२ रोजी निधन झाल्याने त्यांचे रिक्तपदी नियुक्ती होणेस त्यांचा लहान भाऊ श्री.विशाल सुनिल शिंदे यांनी अर्ज केलेला आहे.<br>तथापि,कै.तुषार सुनिल शिंदे व कै.अविनाश सुनिल शिंदे यांचे निधन नैसर्गीकरीत्या झालेले आहे तसेच, हे दोघेही अविवाहीत होते, असे दस्तऐवजावरुन निदर्शनास येत आहे.<br>परंतु, **सेवाप्रवेश नियमाबाबत नियुक्ती प्राधिकारी म्हणुन मा. आयुक्त महोदय यांना प्राप्त असलेले विशेष अधिकार सदर प्रकरणी वापर करणेस मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होणे आवश्यक असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्ताव सादर करावा. अशी शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड) | (नरेंद्र महाजन) | (बी. जी. सोनकांबळे) | (दिलीप मेनकर) | (मनोज घोडेपाटील) | (अशोक आत्राम) |
| संचालक,घ.व्य.वि | मुख्य वित्त व लेखाधिकारी | मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण) | उपआयुक्त (प्र.) | अतिरिक्त आयुक्त (सेवा) |

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ३ | **कै.प्रशांत वसंत चव्हाण** (मयत सफाई कामगार) | **श्री. दिनेश वसंत चव्हाण** नामनिर्देशित व्यक्ती - (भाऊ) | कै. प्रशांत वसंत चव्हाण, मयत सफाई कामगार यांचे रिक्तपदी नियुक्ती होणेकामी श्री.दिनेश वसंत चव्हाण (भाऊ) व श्रीम.हंसा प्रविण चव्हाण (वहिनी) यांनी अर्ज सादर केले असुन, श्री.दिनेश वसंत चव्हाण यांनी नियुक्तीबाबतचे सर्व आवश्यक दस्तऐवज सादर केलेले आहे. परंतु, सौ. हंसा प्रविण चव्हाण यांनी अर्जा व्यतिरीक्त कोणतेही दस्त सादर केलेले नाही.<br>श्री.चव्हाण यांनी सादर केलेले दस्तांमध्ये जातीचा दाखला व शाळा सोडल्याच्या दाखल्यावर दिगंबर वसंत चव्हाण नाव नमुद आहे. परंतु, आधारकार्ड, पॅनकार्ड, महाराष्ट्र शासन राजपत्रात नाव बदलची नोंद ईत्यादी दस्तांवर श्री.दिनेश वसंत चव्हाण हे नाव नमुद आहे. तसेच, दिगंबर व दिनेश या नावाची एकच व्यक्ती असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. तसेच,श्री.दिनेश वसंत चव्हाण यांना नियुक्ती देणेस श्री. प्रविण वसंत चव्हाण (भाऊ) व सौ. हंसा प्रविण चव्हाण (वहिनी) यांचे व्यतिरीक्त सर्व कुटुंबाने संमती दिलेली आहे.<br>कै. प्रशांत वसंत चव्हाण यांनी हयातीत असतांना सादर केलेल्या वारस नामनिर्देशन DCPS (Form- 1) पत्रात श्री.दिनेश वसंत चव्हाण (भाऊ) यांचे एकमेव नाव नामनिर्देशीत केलेले आहे.<br>**श्री. व सौ. प्रविण वसंत चव्हाण हे एकत्र कुटुंबात राहत नसलेबाबत निदर्शनास येत आहे. परंतु, श्री.दिनेश वसंत चव्हाण हे एकत्र कुटुंबात राहत असलेबाबत खात्री होणेकामी अद्यावत कुटुंब पत्रीका मागविणे. सदरची पुर्तता झालेनंतर प्रस्ताव आगामी कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेत यावा. अशी शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४ | **श्रीम. रेखा सुकबीर कागडा** (स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री. अभिजित रोहिदास कागडा** नामनिर्देशित व्यक्ती - (पुतण्या) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये नामनिर्देशीत वारस म्हणून **श्री. अभिजित रोहिदास कागडा, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ५ | **श्री.उत्तम काशिनाथ बकरे** (स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री. हर्षल उत्तम बकरे** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. हर्षल उत्तम बकरे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

(डॉ.आवेश पलोड)
संचालक,घ.व्य.वि

(नरेंद्र महाजन)
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(बी. जी. सानकांबळे)
मुख्य लेखापरिक्षक

(दिलीप मेनकर)
उपआयुक्त (समाजकल्याण)

(मनोज घोडेपाटील)
उपआयुक्त (प्र.)

(अशोक आत्राम)
अतिरिक्त आयुक्त (सेवा)

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ६ | **श्री.नितीन प्रकाश जाधव**<br>(वैद्यकिय कारणास्तव सवेवानिवृत्त) | **श्री.कुणाल माधव पगारे**<br>नामनिर्देशित व्यक्ती -<br>(आतेभाऊ) | श्री. नितीन प्रकाश जाधव यांचा विवाह शिल्पा दादासाहेब साळवे यांचेसोबत दि.०१.०५.२०१० रोजी झालेला होता. परस्परांचे मतभिन्नतेमुळे कौटुंबीक न्यायालयाकडील न्यायनिर्णयान्वये दिनांक २८.०२.२०२२ रोजी त्यांचा घटस्फोट झाला असल्याचे निदर्शनास येत आहे.तसेच, लग्नानंतर त्यांना कोणतेही अपत्य झाले नसुन ते मागील काही वर्षापासुन आजारी असल्याने त्यांची सर्व वैद्यकिय सेवा त्यांचा मामेभाऊ श्री. कुणाल माधव पगारे हाच करीत असल्याने त्यांचे रिक्तपदी नियुक्ती होणेस त्यांचे नाव नामनिर्देशीत केले असल्याचे श्री.जाधव यांनी संमतीपत्रात नमुद केले आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये नामनिर्देशीत वारस म्हणून **श्री.कुणाल माधव पगारे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ७ | **कै. गौतम धोंडीराम नेटावणे**<br>(मयत सफाई कामगार) | **श्री.पियुष गौतम नेटावणे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.पियुष गौतम नेटावणे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ८ | **कै.प्रकाश जगन सुरवाडे**<br>(मयत सफाई कामगार) | **श्रीम.निलम प्रकाश सुरवाडे**<br>(पत्नी) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (१) या तरतुदीनुसार 'पत्नी' या नात्याने **श्रीम.निलम प्रकाश सुरवाडे, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण) | (मनोज घोडेपाटील)<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| ९ | **श्री.लक्ष्मण वामन पगारे** (सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम) | **श्री. प्रफुल्ल लक्ष्मण पगारे** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने श्री. प्रफुल्ल लक्ष्मण पगारे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत असलेबाबत निर्णय घेणेत आला.<br>परंतु बैठकीनंतर अर्जदार श्री. प्रफुल्ल लक्ष्मण पगारे यांनी B.E. (Electrical) शिक्षण पुर्ण केले असल्याने त्यांनी त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार सहा.कनिष्ठ अभियंता या पदावर नोकरीत सामावुन घेणेस विनंती अर्ज केलेला आहे. श्री.प्रफुल्ल लक्ष्मण पगारे यांचेबाबत सादर केलेल्या विषयसुचीमध्ये लिपीकाचे नजरचुकीने सफाई कामगार पदावर नियुक्ती होणेबाबत नमुद झाले. ही बाब बैठकीनंतर संचालक (घ.व्य.वि.) यांचे लक्षात आली.<br>**कर्मचारी निवड समितीसमोर सादर केलेल्या विषयसुचीबाबत संबंधित लिपीकाचे नजरचुकीने ही बाब नमुद झाली असुन अर्जदारचे मागणीप्रमाणे बैठकीमध्ये निर्णय होणे आवश्यक असल्याने सदरचे प्रकरण आगामी कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस सदस्य सचिव तथा संचालक,घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी शिफारस केलेली आहे.** स्वतंत्र बैठकीत क बाबत निर्णय घ्यावा. |
| १० | **श्री.अरूण बन्सी गरूड** (सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम) | **श्री. सिध्दांत अरूण गरूड** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. सिध्दांत अरूण गरूड, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ११ | **श्री.नवनित मनोहर काळे** (स्वेच्छानिवृत्त स्वच्छता मुकादम) | **श्री. किरण नवनित काळे** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. किरण नवनित काळे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १२ | **श्री.धर्मपाल मंगते बिडलान** (स्वेच्छा निवृत्त सफाई कामगार) | **श्री. अंकित धरम बिडलानी** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. अंकित धरम बिडलानी, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन)<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (दिलीप मेनकर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण) | (मनोज घोडेपाटील)<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |
|---|---|---|---|---|---|

प.३३०

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | शिफारस / निर्देश |
|---|---|---|---|
| १३ | **श्रीम. शोभा बाळु बागुल** (स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्रीम. राणी नितीन दोंदे** नामनिर्देशित व्यक्ती - (विवाहीत मुलगी) | श्री. शोभा बाळु बागुल स्वेच्छा निवृत्त सफाई कामगार यांचे रिक्तपदी त्यांचा मुलगा श्री. यश बाळु बागुल यांना आदेश क्र.४५ दि. १८.०३.२०२० अन्वये सफाई कामगार या पदावर नियुक्ती देण्यात आले नुसार श्री. यश बागुल यांनी कामावर हजर करुन घेणे कामीरुजु रिपोर्ट नाशिकरोड विभागाकडे सादर केला. परंतु, ते प्रत्यक्ष कामावर हजर न झाल्याने त्यांना नोटीस देण्यात आली असता, त्यांनी सदर नोटीसेला कुठलाही प्रतिसाद अथवा लेखी न कळवल्याने आदेश क्र. १४० दि. २२.१०.२०२० अन्वये सेवा समाप्तीचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.<br>तद्नंतर सदर प्रकरणी श्रीम. शोभा बांळु बागुल यांची मुलगी श्रीम.राणी नितीन दोंदे ऊर्फ राणी बाळु बागुल यांनी नोकरी मिळणे कामी अर्ज केल्याने सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त महोदय यांचेकडेस सादर केला असता लाड कमिटी शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती अंमलबजावनी बाबत कोणतेही शासन निर्णयामध्ये एक वारसाने नोकरी नाकारल्यास दुसऱ्या योग्य वारसास नोकरी देऊ नये अशी तरतुद नसल्याने दुसऱ्या वारसाचे प्रकरण सादर करावे. असे मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०७.०४.२०२२ रोजी आदेशीत केलेप्रमाणे श्रीम.राणी नितीन दोंदे ऊर्फ राणी बाळु बागुल यांन्ग नियुक्ती प्रस्ताव आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ मधील तरतुदी अन्वये **नामनिर्देशीत वारस म्हणून राणी नितीन दोंदे, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

उपरोक्त नमुद प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत चर्चा करणेत आली. दिलेले निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

**(डॉ.आवेश पलोड )**
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(नरेंद्र महाजन)**
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(बी. जी. सोनकांबळे)**
**मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(दिलीप मेनकर)**
**उपआयुक्त (समाजकल्याण )**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(मनोज घोडेपाटील)**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(अशोक आत्राम)**
**अतिरिक्त आयुक्त,सेवा**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक